**जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली , पुरवठा विभाग**

ई- मेल - supplyofficerhnl@gmail.com फोन - 02456221458

जा.क्र.2018/पुरवठा/अन्नधान्य/वाहतूक कंत्राट/सिआर-16 दिनांक 16 /03/2020

**वाचाः-** 1. मा.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. 1012 /प्र.क्र 60/नापु-16 अ. दि. 26/11/2012

2. मा.सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे पत्र जा.क्र.कंत्राट-1118/ प्र.क्र.99 ना.पु.16 अ दिनांक 07 सप्टेंबर, 2019

3. मा.सह सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे पत्र क्र.कंत्राट-1114/प्र.क्र.94/ना.पु.16अ दिनांक 14 मार्च, 2020

## जाहीर प्रगटन

**विषयः- हिंगोली जिल्ह्यातील लक्षनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्य वाहतूकीकरीता तीन महिन्यांच्या कालावधीसाठी पर्यायी वाहूकदाराची निवड करण्याकरीता दरपत्रके मागविणे बाबत.**

याद्वारे सूचीत करण्यात येते की, मा.सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे पत्र जा.क्र.कंत्राट-1118/ प्र.क्र.99 ना.पु.16 अ दिनांक 07 सप्टेंबर, 2019 अन्वये मे.खुराणा रोड लाईन्स, हिंगोली या कार्यरत वाहतूक कंत्राटदाराचे वाहतूकीचे कंत्राट रद्द करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने लक्षनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता **पहिला टप्पा-** भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो तसेच शासनाने निर्धारीत केलेल्या गोदामापासून ते जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदाम, व **दुसरा टप्पा-** शासकीय धान्य गोदाम ते जिल्ह्यातील रास्तभाव दुकानांपर्यंत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. 1012 प्र.क्र 60/नापु-16 अ. दि. 26/11/2012 मधील अटी व शर्तीनुसार, 03 महिन्यांच्या कालावधीसाठी पर्यायी वाहतूकदाराची निवड करून जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूकीचे काम करून घेण्याकरीता खालील अटी व शर्तीनुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती**

- हिंगोली जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूकीकरीता इच्छुक वाहतूकदारांनी बंद पाकीटमध्ये ऑफलाईन पध्दतीने जिल्हा पुरवठा कार्यालयात विहीत मुदतीत दरपत्रके सादर करावी लागतील.
- दिनांक 26/11/2012 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार 03 महिन्यांच्या कालावधीसाठी पर्यायी वाहतूकदाराची निवड करून जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूक कार्यान्वित करण्याकरीता (पहिला टप्पा व दुसरा टप्पा) वाहतूकदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.
- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक 26/11/2012 मधील अटी व शर्ती लागू राहतील. त्यामुळे सदर शासन निर्णयाचा सखोल अभ्यास करून दरपत्रके सादर करावीत.
- सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच या शासन निर्णयाची एक प्रत या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे.
- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक 26/11/2012 मधील नमूद केलेली आवश्यक कागदत्रे वाहतूकदारास दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य आहे.
- शासन निर्णय दिनांक 26/11/2012 मधील परिच्छेद क्र.12 मध्ये निर्देशित केल्यानुसार अन्नधान्य वाहतूकीसाठी मालकीच्या व नियंत्रणाखालील आवश्यक वाहनांची (ट्रकची) संख्या असावी लागेल.
- जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूकीसाठी वाहतूकदाराकडून कमीत कमी 3 दरपत्रके प्राप्त होणे अनिवार्य आहे. 3 दरपत्रक प्राप्त झाल्यानंतरच सदर वाहतूकीचे दरपत्रक उघडण्यात येतील.
- जिल्ह्यातील कार्यरत वाहतूक कंत्राटदार यांचे दर हिंगोली जिल्ह्यातील पहिला टप्पा भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो ते जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदाम व दुसरा टप्पा शासकीय धान्य गोदाम ते जिल्ह्यातील रास्तभाव दुकानांपर्यंत अन्नधान्य वाहतूकीच्या अंतराचे टप्पे व आधारभूत दर व जिल्हाधिकारी महोदयांनी आधारभूत दरावर



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

**ई- मेल - supplyofficerhnl@gmail.com** **फोन - 02456221458**

---

WPI नुसार मंजूर केलेली वाढ असे एकुण 84.76 टक्के अधिक (+) असे आहेत. (शासन निर्णयातील परिच्छेद क्र.06 मध्ये नमूद केलेले टप्पेनिहाय आधारभूत दरावर)

- प्राप्त होणाऱ्या दरपत्रकातील दर हे जिल्ह्यातील कार्यरत वाहतूक दरांच्या मर्यादेत असल्यास अशा दरपत्रकास जिल्हाधिकारी हिंगोली यांचे स्तरावर मूंजरी देण्यात येईल.
- ज्या वाहतूकदाराची दरपत्रके ही जिल्ह्यातील कार्यरत वाहतूक दाराच्या दरांपेक्षा जास्तीचे प्राप्त झाल्यास वाटाघाटी अंती मंजूर करण्यात आलेल्या जास्तीचे दरपत्रकास मा.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- हिंगोली जिल्ह्यातील अन्नधान्याचे नियतन, भारतीय अन्न महामंडळाचे गोदाम ते तालुक्याचे गोदामापर्यंतचे सरासरी अंतर, तालुक्याचे गोदाम ते जिल्ह्यातील रास्तभाव दुकानदार यांचे सरासरी अंतर, दुकानांची संख्या इ.ची माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती उपलब्ध करून घेऊन सर्व बाबींचा अभ्यास करून वाहतूकीचे दरपत्रक भरावीत.
- वाहतूकदाराची शासन निर्णय दिनांक 26/11/2012 मध्ये नमूद केल्यानुसार आर्थिक उलाढाल असणे आवश्यक आहे.
- सदर शासन निर्णयातील सर्व बाबी, तरतुदी, अटी लक्षात घेऊनच दरपत्रक सादर करावेत. त्यानंतर दरातील बदलाबाबत विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- सदर दरपत्रकाचा नमूना जिल्हा पुरवठा कार्यालयात अन्नधान्य शाखेतून प्राप्त करून घेण्यात यावेत.
- प्राप्त झालेली सर्व दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी हिंगोली यांना राहतील.

तरी इच्छूक वाहतूकदारांनी हिंगोली जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूकीसाठी शासन निर्णय दिनांक 26/11/2012 मधील सर्व अटी व शर्तीचा अभ्यास करून व वरील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार वाहतूकीचे दरपत्रक बंद पाकीटमध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दिनांक 27/03/2020 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**जिल्हाधिकारी हिंगोली**



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली , पुरवठा विभाग

ई- मेल - supplyofficerhnl@gmail.com

फोन - 02456221458

वाचा:- मा.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. 1012 /प्र.क्र 60/नापु-16 अ. दि. 26/11/2012

2. मा.सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.कंत्राट-1118/ प्र.क्र.99 ना.पु.16 अ दिनांक 07 सप्टेंबर, 2019

3. मा.सह सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे पत्र क्र.कंत्राट-1114/प्र.क्र.94/ना.पु.16अ दिनांक 14 मार्च, 2020

## अन्नधान्य वाहतूक दरपत्रक नमुना

याद्वारे सूचीत करण्यात येते की, मा.सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.कंत्राट-1118/ प्र.क्र.99 ना.पु.16 अ दिनांक 07 सप्टेंबर, 2019 अन्वये मे.खुराणा रोड लाईन्स, हिंगोली या कार्यरत वाहतूक कंत्राटदाराचे वाहतूकीचे कंत्राट रद्द करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने लक्षनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमी करीता पहिला टप्पा भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो CWC / MSWC वाशिम, नांदेड व परभणी तसेच शासनाने निर्धारीत केलेल्या गोदामापासून ते हिंगोली जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामापर्यंत व दुसरा टप्पा शासकीय धान्य गोदाम ते जिल्ह्यातील रास्तभाव दुकानापर्यंत संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनुसार 03 महिन्यांच्या कालावधीसाठी पर्यायी वाहतूकदाराची निवड करून जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूकीसाठी खाली दिलेल्या नमून्यामध्ये दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात सादर करावे.

जिल्ह्यातील वाहतूक कंत्राटदार यांच्या कार्यरत दरावर निर्धारीत केलेले अन्नधान्य वाहतूकीकरीता अंतराचे टप्पे व आधारभूत दर खालील प्रमाणे असतील.

| टप्पे कि.मी. | आधारभूत दर | आधारभूत दरापेक्षा (+) टक्के अधिक मा.जिल्हाधिकारी महोदयांनी (WPI) नुसार मंजूर केलेली वाढ सहीत | वाहतूकदाराने द्यावयाचे दर (% मध्ये) |
|---|---|---|---|
| 0 ते 02 कि.मी. | 37/- प्रतिटा (संपूर्ण अंतरा करीता) | 84.76 टक्के अधिक | |
| 02 ते 10 कि.मी. | 7/- प्रती टा प्रती कि.मी. | | |
| 10 ते 50 कि.मी. | 6/- प्रती टा प्रती कि.मी. | | |
| 50 कि.मी साठी एकुण | - | | |
| 50 कि.मी. च्या पुढे | 4/- प्रती टा प्रती कि.मी. | | |

वाहतूकदाराचे नाव / संस्थेचे नाव व पत्ता- ----------------------------------------------------------------

वाहतूकदाराची स्वाक्षरी

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी हिंगोली



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner